**ठळक बातम्या**

- गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासावर रालोआ सरकारचं लक्ष केंद्रीत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून सात दिवस फ्रान्स, युरोपीय महासंघ आणि बेल्जियमच्या  दौऱ्यावर

- राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेच्या आक्षेपांबाबत निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा, असं केंद्रीय निवडणूक आयोगाचं आवाहन/तर आयोग वस्तुनिष्ठ उत्तरं देत नसल्याचा काँग्रेसचा आरोप

**आणि**

- ९९वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात होणार

**<><><><><>**

विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासावरच रालोआ सरकारचं लक्ष केंद्रित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महिलांनी गेल्या ११ वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

सेवा, सुशासन आणि गरीबांचं कल्याण या तत्वांनी प्रेरित झालेल्या भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. या अकरा वर्षांच्या काळात महिलांच्या विकासावरही भर देण्यात आला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सुरू केलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरणाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. याविषयी सविस्तर जाणून घेऊया..

**व्हॉईस कास्ट १.२० मिनिट)**

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात याचा उल्लेख केला आहे. विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत नारी शक्तीवर रालोआ सरकारने विशेष लक्ष दिलं आहे. महिलांनी गेल्या ११ वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उत्तम पोषण मिळण्यासाठी सरकारने सुरू केलेल्या मिशन पोषण २.० या उपक्रमाद्वारे किशोरवयीन मुली तसंच मातांच्या पोषणावर भर दिला जात आहे. पोषणासह दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळावं यासाठी दोन लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रं सुरू करण्यात आली आहेत. आरोग्याच्या आघाडीवर जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम आणि जननी सुरक्षा योजना यांमुळे ग्रामीण आणि वंचित भागात सुरक्षित प्रसूती तसंच प्रसूतीसंबंधित आरोग्यासाठी सेवा उपलब्ध झाली आहे. स्वच्छ भारत अभियानांर्गत १२ कोटींहून अधिक शौचालयं बांधण्यात आली असून त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेत लक्षणीय वाढ झाली आहे. उज्ज्वला योजनेमुळे १० कोटींहून अधिक एलपीजी गॅसजोडण्या दिल्या गेल्या असून त्यामुळे अनेक स्वयंपाकघरं धूरमुक्त झाली आहेत. जलजीवन अभियानामुळे १५ कोटींहून अधिक घरांमध्ये नळाने पाणी पोहोचलं असून त्यामुळे महिलांना होणारा पाण्याच्या शोधाचा त्रास कमी झाला आहे. सुकन्या समृद्धी योजनेत ४ कोटी २० लाखांहून अधिक खाती उघडण्यात आली असून त्यामुळे मुलींसाठी आर्थिक सुरक्षितता निश्चित केली आहे.*

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आज फ्रान्स, युरोपीय महासंघ आणि बेल्जियमच्या सात दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना झाले आहेत. या फ्रान्स दौऱ्यादरम्यान, पॅरिस आणि मार्सेली इथं ते भेट देणार असून फ्रान्सचे ‘युरोप आणि परराष्ट्र’विषयक मंत्री जीन नोएल बॅरोट यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. फ्रान्सच्या वरिष्ठ नेतृत्वाशी ते विचार विनिमय करतील, तिथल्या मान्यवर विचारवंतांशी आणि प्रसारमाध्यमांबरोबरही ते संवाद साधतील. पहिल्या ‘भूमध्यसागरीय रायसीना संवादा’तही डॉ. जयशंकर सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज उत्तराखंडमधल्या गढवाल परिसराला भेट देऊन कार्मिक सज्जतेचा आढावा घेतला. सरहद्दीजवळ देशाच्या रक्षणासाठी तैनात सैनिकांशी त्यांनी संवाद साधला आणि त्यांच्या समर्पित सेवेचं कौतुक केलं. सतर्कता आणि सज्जता उच्च दर्जाची राखण्यावर त्यांनी भर दिला. ज्योतिर्मठ इथं आयबेक्स तराणा या कम्युनिटी रेडिओ वाहिनीचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार जनरल द्विवेदी यांनी एका कार्यक्रमात केला.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये पाच जिल्ह्यांमध्ये अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली आहे. मैतेई समुदायाच्या अरंबाई टेंगगोल या कट्टरतावादी संघटनेच्या सदस्यांना झालेल्या अटकेनंतर या भागात हिंसक निदर्शनं झाली होती. त्यामुळे इंफाळ पश्चिम, इंफाळ पूर्व, थौबल, बिष्णुपूर आणि काकचिंग या पाच जिल्ह्यांमध्ये आधी पाच दिवसांसाठी इंटरनेट सेवा बंद करण्यात आली होती. त्यानंतर आता संचारबंदी आणि जमावबंदीही लागू करण्यात आली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी या पाचही जिल्ह्यांमध्ये सशस्त्र दलांची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

प्राणघातक हल्ला करून संरक्षण दलाच्या दोन जवानांचा बळी घेणाऱ्या मणिपूर मधल्या तीन बंडखोरांना आज एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या पथकानं अटक केली. हे बंडखोर कुकी इनपी तेंगनौपाल बंडखोर समूह, कुकी नॅशनल आर्मी तसंच चुरा चंदपूर जिल्ह्यातल्या ग्रामीण स्वयंसेवक समुहाचे हस्तक आहेत. या बंडखोरांनी गेल्यावर्षी १७ जानेवारीला मोरेह इथं केलेल्या हल्ल्यात काही जवान जखमी झाले होते. या हल्ल्यात सामील असलेल्या इतर बंडखोरांचा शोध घेण्याची मोहीम सुरू असल्याचं एनआयएनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सार्वजनिक मंचावरून निवडणूक प्रक्रियेविषयी आरोप करण्याऐवजी, निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं असल्याचं, अधिकृत सूत्रांनी सांगितलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला होता, त्यावर निवडणूक आयोगानं पुन्हा एकदा हे आवाहन केलं. गांधी यांनी आपली तक्रार लिखित स्वरूपात द्यावी, तसंच प्रत्यक्ष येऊन भेटावं असं आयोगानं म्हटलं आहे. निवडणूक आयोगानं काँग्रेसला १५ मे रोजी भेटीचं आमंत्रण दिलं होतं, मात्र

त्यांनी ही भेट टाळली. गांधींचे आरोप इतके गंभीर आहेत, मात्र ते, तक्रार लिखित स्वरुपात देण्याचं टाळत आहेत, हे आश्चर्यजनक आहे, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याच्या राहुल गांधी यांच्या आरोपांवर निवडणूक आयोग वस्तुनिष्ठ उत्तरं का देत नाही असा सवाल काँग्रेसने केला आहे. काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं, की राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना निवडणूक आयोगानं उत्तरं दिली पाहिजेत... परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासंदर्भात लेख लिहून जनतेची दिशाभूल केली आहे. राज्य विधानसभा निवडणुकीच्या वेळचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम आणि किरण कुलकर्णी यांची नार्को टेस्ट करावी अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे. यासंदर्भात राहुल गांधी प्रसारमाध्यमांशी बोलतात या आक्षेपावर प्रसारमाध्यमं हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत, हे निवडणूक आयोगाला मान्य नाही का, असा सवाल सपकाळ यांनी विचारला.

**<><><><><>**

९९ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होईल, अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी दिली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुणे इथं आज झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमतानं घेण्यात आला. संमेलन आयोजित करण्याचा मान साताऱ्यातल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फौंडेशनला मिळणार आहे. साताऱ्यात होणारं हे चौथं संमेलन आहे.

**<><><><><>**

आसाममधल्या पुरस्थितीत आज आणखी सुधारणा झाली आहे. मात्र ३० हजाराहून अधिक स्थानिक अजूनही छावण्यांच्या आश्रयाला असून १२ जिल्ह्यांमधल्या ९०० गावांमधले ३ लाखाहून अधिक नागरिक महापुरात अडकलेले आहेत. ब्रह्मपुत्रेचा पूर ओसरला असला तरी अन्य नद्या मात्र धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत. महापुरात अडकलेल्या नागरिकांचं बचाव कार्य सुरु आहे. आसामच्या केचर, श्रीभूमी तसंच हेलकंदी जिल्ह्यातल्या तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//